M. M. Industries, Nashik.

# म्यानमारमध्ये भारतीय उद्योजकांना संधी

**नाशिक (प्रतिनिधी) :** शेतीवर ९५ टक्के अवलंबून असणारा म्यानमार हा भारताच्या लगतचा महत्त्वाचा देश आहे. या देशातील शेतकऱ्यांची कर्मनिष्ठा आणि प्रामाणिकपणा उल्लेखनीय आहे. विशेष म्हणजे म्यानमारने उद्योग व्यापाराचे नियम भारतासाठी शिथिल केले असल्याने भारतीय उद्योजकांना म्यानमारमध्ये उद्योग करण्यास मोठी संधी असल्याचे उद्योजक मनोहर शेटे यांनी सांगितले. श्री. शेटे हे मागील दहा वर्षांपासून म्यानमारमध्ये सेंद्रिय शेती उत्पादनांची निर्यात करीत आहेत.

श्री. शेटे म्हणाले, की म्यानमार हा देश भारताचा चांगला व्यावसायिक शेजारी बनला आहे. या देशात चीनपेक्षा भारतीय उत्पादने आणि सेवांना अधिक प्राधान्य दिले जाते. कारण तेथील लोकांना भारतीय उत्पादने आणि सेवांबाबत अधिक विश्वास वाटतो. म्यानमार तसा विकसनशील देश असल्याने त्याची क्रयशक्ती कमी आहे. त्यामुळे भारताकडील सेवा व उत्पादने म्यानमारला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहेत. भारतीय उद्योजक सिंगापूरमार्गे म्यानमार देशाशी आर्थिक व्यवहार करू शकतात. म्यानमारमध्ये पाणी, जागा, मनुष्यबळ यांची कमतरता नाही.

दोन्ही देशांमध्ये व्यावसायिक संबंध दृढ होण्यासाठी राजकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबरीने गेल्या काही दिवसांत परराष्ट्र मंत्रालय; तसेच दोन्ही देशांमध्ये सचिव पातळीवर बैठका होत आहेत. त्याचाही व्यापार वाढविण्यासाठी फायदा होणार आहे. भारत सरकारच्या मदतीने भारत-म्यानमार सीमेपासून महामार्गाचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे पुढील काळात व्यापार वाढण्याची शक्यता आहे. त्यामध्ये शेती उद्योगांना चांगली संधी आहे.



म्यानमार येथील उद्योजकांच्या सोबत मनोहर शेटे